# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील ग्रामीण भागातील सुमारे १२ हजार वस्त्यासाठी पाणीपुरवठयाची व्यवस्था नसल्याबाबत**

**(१) १९२५ (१५-०१-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील तब्बल ४२ हजार वस्त्यांना नळाद्वारे पाणीपुरवठा होत नसून सुमारे १२ हजार वस्त्यासाठी पाणीपुरवठयाची कोणतीच व्यवस्था नसल्याची माहिती माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वस्त्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्यात दि. ०१/०४/२०१५ रोजी असलेल्या १००६३९ एवढे गावे/वाड्या/वस्त्यांपैकी दि. ३१/०३/२०१५ पर्यंत ८९,४०४ एवढे गावे/वाड्या /वस्त्या पूर्णत: हाताळण्यात आल्या असून उर्वरित ११,२३५ गावे/वाड्या/वस्त्या अंशत: हाताळण्यात आल्या आहेत.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत गावे/वाड्या/वस्त्या यांना पाणी पुरवठा करण्यासाठी नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येतात. त्या अनुषंगाने सन २०१५-१६ या वर्षात पाणी पुरवठ्यासाठी २,८३५ गावे/वाड्या/वस्त्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी ९५७ गाव/वाड्या/वस्त्यांचे उद्दिष्ट डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण करण्यात आले असून सदर गावे/वाड्या/वस्त्यांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पाणी पुरवठा योजनांबाबतचा अहवाल**

**(२) २०१९ (१५-०१-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणी पुरवठा योजनांसाठी प्रचंड प्रमाणात खर्च होवून सुध्दा राज्याच्या ग्रामीण लोकसंख्येच्या १९ टक्के नागरीकांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याचा अहवाल नियोजन विभागाने मानव विकास अहवालात नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) अहवालानुसार नंदुरबार, बीड, वाशिम, हिंगोली, जालना, नांदेड, यवतमाळ, गडचिरोली या नऊ जिल्ह्यामध्ये ६० टक्के लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होवू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**सोलगांव, देवाचेगोठणे, धारतळे, उपळे (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) या परिसरातील प्राचीन कातळशिल्पांना सुरुंगामुळे धोका पोहोचला असल्याबाबत**

**(३) १८३९२ (०६-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलगांव, देवाचे गोठणे, धारतळे, उपळे (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) या परिसरातील प्राचीन कातळशिल्पांना सुरुंगामुळे धोका पोहोचला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अद्यापही उत्तम अवस्थेत असलेली काही कातळशिल्पे जपण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही,

सोलगाव येथील कातळशिल्पांच्या परिसरात आंब्याची झाडे लावण्यासाठी छोटे सुरुंग लावण्यात आले होते, तथपि ही जागा सोलगाव येथील कातळशिल्पांपासून बरीच दूर असल्यामुळे कातळशिल्पांना कोणताही धोका पोचलेला नाही. देवाचेगोठणे, धारतळे व उपळे येथील शिल्पांजवळ कोणतेही सुरुंग लावण्यात आलेले नाहीत.

(२) सहाय्यक संचालक, रत्नागिरी यांनी या ठिकाणी असलेल्या तथाकथित कातळशिल्पांची पाहणी केली असून सोलगाव व उपळे येथील कातळशिल्पांचा अपवाद वगळता या शिल्पांसारख्या वाटणाऱ्या आकृती खडकाची नैसर्गिक झीज झाल्यामुळे निर्माण झाल्या आहेत

असा सहाय्यक संचालक, रत्नागिरी यांचा प्राथमिक निष्कर्ष आहे. सोलगाव व उपळे येथील शिल्पे मानवनिर्मित आहेत किंवा नाहीत याबाबत संभ्रम आहे. आणि जर ही शिल्पे मानवनिर्मित आहेत असे मानले तरी या शिल्पांचा काळ ओळखणे खूप कठीण आहे. सबब संबंधित क्षेत्रातील तज्ञांचा अहवाल मागविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तळगड (जि.रायगड) किल्ल्याच्या दुरुस्तीसंदर्भात**

**(४) १९८२० (०६-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळगड (जि.रायगड) किल्ल्यावरील अनेक अवशेष नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गडाच्या दुरुस्तीकरीता तेथील नागरिकांनी व इतिहासप्रेमींनी वारंवार संबंधित अधिका-यांकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गडाच्या दुरुस्तीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) तळगड किल्ला “राष्ट्रीय संरक्षित स्मारक” असून तो केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या मुंबई मंडल कार्यालयाच्या अखत्यारीत येतो, अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुबई मंडल यांनी दिलेल्या माहितीनुसार हे खरे नाही.
(२) व (३) हे ही खरे नाही,

सदर गडाच्या दुरुस्ती संदर्भात तेथील नागरिक व इतिहासप्रेमींमार्फत कुठल्याही प्रकारची मौखिक अथवा लेखी तक्रार अधिक्षक, पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडल कार्यालय मुंबई यांना प्राप्त झालेली नाही. तळगड किल्ल्याच्या देखभालीचे काम नित्यनियमित स्वरुपात चालू असते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथे छ.शाहू महाराज यांच्या जन्मस्थळाचा व मुक्काम असलेल्या ठिकाणांचा स्मारक व पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्याची मागणी**

**(५) २१४८९ (३१-०७-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील सोनतळी (रजपूतवाडी) कॅम्पवर संस्थान काळात लोकराजा छत्रपती शाहू महाराजांचा मुक्काम असलेल्या ठिकाणी स्मारक व पर्यटनाच्या दृष्टीने जागेचा विकास करण्याची मागणी संबंधित अधिका-यांकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या लक्ष्मी विलास पॅलेस या जन्मस्थळाचे काम संथ गतीने सुरु असून जतन आणि विकास समितीची दोन वर्षात एकही बैठक झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सध्याची कामे समितीला विचारात न घेता केवळ वास्तुविशारदाच्या सल्ल्याने सुरु असून म्युझियमचा अद्याप आराखडाही तयार करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील मागणीनुसार सदरचे ठिकाण पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासंदर्भात व शाहू जन्मस्थळांचे काम जलद गतीने सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :**(१) नाही,

जिल्हा नियाजेन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांनी कळविल्यानुसार हे खरे नाही.

(२) नाही,

पुरातत्व विभागाकडे असलेली सर्व जतन व दुरुस्तीची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असलेली कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे. जतन आणि विकास समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी वेळोवेळी स्मारकाच्या जतन व दुरुस्ती कामाचा आढावा घेतला आहे.

(३) नाही,

विकास समितीच्या शिफारशीनुसार वास्तुविशारद यांनी आराखडा तयार करण्यात आला आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धोत्रा नंदई (ता.देऊळगांवराजा, जि.बुलढाणा) येथील हेमांडपथी महादेव मंदिराचे कुंपन घालण्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत**

**(६) २२३२९ (१६-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धोत्रा नंदई (ता.देऊळगांवराजा, जि.बुलढाणा) येथील सुप्रसिध्द हेमांडपथी महादेव मंदिराचे कुंपन घालण्याचे काम पुरातत्व विभागातर्फे सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी बुलढाणा पुरातत्व संबधीत अधिकारी यांच्याकडे गत ६ महिन्यांच्या काळात वारंवार केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर काम दर्जेदार करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१६) :**(१) होय,

सदर काम केंद्रशासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय नागपूर यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती महोत्सव नागरी दलित वस्ती अंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे अनुदान वितरणात बदल करणेबाबत**

**(७) २४०६६ (२९-०७-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती महोत्सव नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधण्याकरिता एकूण १०,८०० रुपयांचे शासन अनुदान वितरीत केले जाते, शौचालयाचा खड्डा पुर्ण झाल्यानंतर ३००० रुपये व शौचालय स्पेरीफिकेशन पूर्ण झाल्यास, उर्वरीत रक्कम देण्यात येते त्यात बदल करुन पहिला हप्ता ६००० रुपये उर्वरीत रक्कम दुसऱ्या हप्त्यात देण्यात यावा याबाबत दिनांक २४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांचे दालनात संपन्न झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे अनुषंगाने अनुदान वितरीत करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०२-२०१६) :** (१) नाही. तथापि अमरावती शहर पाणी पुरवठा योजनेबाबत दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत खाजगी नळ जोडणी हा विषय चर्चेला आला होता. दिनांक १५ जून, २०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ६ अन्वये खाजगी नळ जोडणी व त्याअनुषंगाने करावयाची कामे मजीप्रामार्फत करण्यात यावीत व मजीप्राकडून काम पूर्ण झाल्याचे प्रमाणित झाल्यानंतर संबंधित नागरी स्थानिक संस्थांनी लाभार्थींना धनादेशाने निधी वाटप करण्याचे निर्देश आहेत. मात्र यात बराच कालावधी जात असल्याने सदरचा निधी मजीप्रास वळती करण्याची विनंती अमरावती महानगरपालिकेने केली व त्यानुसार शासन निर्णयात सुधारणा करण्याची विनंती शासनास केली. मात्र सदर प्रस्तावास मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांनी मान्यता दिली नाही. वैयक्तिक शौचालय निधी वितरणात बदल करण्याबाबत कोणताही निर्णय झाला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मावळ (जि.पुणे) तालुक्यातील तुंग किल्ल्याची व रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(८) २४२४५ (३१-०७-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील तुंग किल्ल्यावर पर्यटकांची मोठी गर्दी होत असून पायऱ्या तुटल्याने पर्यटकांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्याच्या बुरुजाचा काही भाग तुटला असून हनुमान मंदिर आणि तुंगायी देवी मंदिराची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किल्ल्याच्या दुरुस्ती बाबत पुरातत्व विभागाकडून परवानगी व रस्त्यांच्या दुरुस्ती बाबत पर्यटन विभागाच्या वतीने निधीची तरतुद करण्यात आली आहे काय, असल्यास तपशिल काय आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) पर्यटन विभागाच्या दिनांक ०४.११.२०१० च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी पुणे यांचेमार्फत पुणे जिल्ह्याचा रु.२४३.५२ कोटीचा पर्यटन बृहत विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्याची महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने छाननी केली आहे. सदर आराखड्यात मावळ तालुक्यातील तुंग किल्ल्याच्या विकास कामांचा समावेश करण्यात आला आहे. सदर आराखड्यास राज्य पर्यटन समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामाच्या प्राधान्यानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार कामांचे कार्यान्वयन हाती घेण्यात येणार आहे.

---

**राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या सर्व नळ पाणीपुरवठा योजनांचे तांत्रिक परीक्षण करण्याचा घेतलेला निर्णय**

**(९) २६०७४ (२९-०७-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या सर्व नळ पाणीपुरवठा योजनांमध्ये झालेल्या मोठ्या प्रमाणातील गैरव्यवहारामुळे अनेक पाणी पुरवठा योजना अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सुरु असलेल्या, पूर्ण झालेल्या आणि अपूर्ण राहिलेल्या सर्व नळपाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक परीक्षण अर्थात ऑडीट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तांत्रिक परीक्षणामध्ये काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय दि. १५/०६/२०१५ अनुसार यापुढे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.
(३) पडताळणी अहवाल त्रयस्थ यंत्रणेद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व आवश्यकतेप्रमाणे प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना सादर केला जाईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिपतगड (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) या गडाची झालेली दुरवस्था**

**(१०) २६३१६ (१६-०८-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिपतगड (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या ऐतिहासिक गडाची दिवसेंदिवस दुर्दशा होत असून गडांचे बुरुज ढासळत असून, गडाच्या दुरावस्थेकडे पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे सदर गड नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिवकालिन गडाची दुरावस्था रोखणे, डागडुजी करणे व सुशोभिकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१६) :** (१) व (२) पुरातत्व विभागामार्फत राज्यातील राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आलेल्या किल्ल्यांच्या जतन व दुरुस्तीचे काम करण्यात येते.

संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांनी कळविल्यानुसार महिपतगड किल्ल्याची बहुतांश तटबंदी खूप पुर्वीच नष्ट झाली असून या किल्ल्याचे खूपच कमी अवशेष शिल्लक असल्यामुळे व उपलब्ध अवशेषांवरुन किल्ल्याच्या मूळ स्वरुपाची यत्किंचितही कल्पना येत नसल्यामुळे हा किल्ला राज्य संरक्षित स्मारक घोषित करता येत नाही.

महिपतगड किल्ला राज्य संरक्षित स्मारक नसल्यामुळे सदर किल्ल्याची जतन व दुरुस्ती पुरातत्व विभागामार्फत करण्यात येत नाही. सबब गडाच्या दुरावस्थेकडे पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष होत आहे ही वस्तुस्थिती नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांमधील गैरव्यवहाराबाबत**

**(११) २६८७३ (१८-०९-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयात टंचाई आढावा बैठकीत पालकमंत्री यांनी ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांमधील गैरव्यवहार आणि कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दरवाजांच्या चोरीच्या

विषयात गुन्हे दाखल करण्याचे आदेश माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दरवाजे चोरी प्रकरणात माहे जून २०१५ अखेरपर्यत किती गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेकडील १३ चोरीच्या घटनांपैकी १२ कोल्हापूरी बंधारे दरवाजे चोरीचे गुन्हे संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये यापूर्वीच दाखल केले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड किल्ल्यावर दिवे लावण्याबाबत व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याची मागणी**

**(१२) २८७९८ (२१-१२-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड किल्ल्यावर (ता.महाड, जि. रायगड) होळीचा माळ,राज दरबार आणि छत्रपतींच्या समाधी स्थळाजवळ रायगड जिल्हापरिषद व स्वयंसेवी संस्थांनी लावलेले सौरउर्जेवर चालणारे दिवे पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी माहे ऑगस्ट , २०१५ मध्ये वा त्यादरम्यान उखडून टाकले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच सह्याद्री प्रतिष्ठान नावाची संस्था गड किल्ल्याचे गेले अनेक वर्ष स्वच्छता व संवर्धन करत आहे व ऐतिहासिक वारसा जोपासण्यासाठी शिवराज्याभिषेक व तत्सम विविध उपक्रम राबवित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेने किल्ल्याचा महादरवाजा व राजसदर येथे सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याची परवानगी पुरातत्व विभागाकडे मागितली आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, रायगडावर दिव्यांची सोय करण्याकरिता व सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्याकरिता पुरातत्व विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) रायगड किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत येतो. अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडल कार्यालय मुंबई यांनी कळविल्यानुसार हे खरे आहे.
(२) भारतीय पुरातत्व सर्वेक्षण Cultural Awareness Programme या योजनेअंतर्गत रायगड किल्ला तसेच विविध राष्ट्रीय स्मारकांच्या ठिकाणी स्वच्छता व संवर्धनाचे उपक्रम राबवित

असते. सदर उपक्रम भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, स्थानिक स्वयंसेवी संस्था व विद्यार्थ्यांसोबत करीत असते, सह्याद्री प्रतिष्ठान ही संस्था त्यापैकी एक आहे. परंतु राज्याभिषेक व तत्सम कार्यक्रम भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मार्फत केले जात नाही.

(३) नाही.

(४) व (५) अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय, मुंबई यांनी कळविल्यानुसार रायगडावर दिव्यांची सोय करण्याकरिता व सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याचे सद्य:स्थितीत प्रस्तावित नाही.

---

**धाडरे (ता.धुळे) गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या विहीरीचे पाणी पिण्यायोग्य नसल्याबाबत**

**(१३) २९३०९ (२१-१२-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाडरे (ता.जि.धुळे) गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या विहीरीचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाला शासनाने पिण्यायोग्य पाणी पुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०१-२०१६) :**(१) , (२) व (३) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धुळे यांचेकडून झालेल्या प्राप्त अहवालानुसार हे खरे नाही.

---

**धुळे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत व योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१४) २९४१८ (२१-१२-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि. धुळे) तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर टंचाई जाणवणाऱ्या गावांचा आढावा वा निवारण करण्यासाठी दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत पाणीपुरवठा योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषींवर फौजदार गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच धुळे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात दहा वर्षात कोट्यावधींचा निधी खर्च होऊनही पाणीपुरवठा योजना अयशस्वी ठरल्याने साक्री तालुक्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्हा परिषदेमार्फत पाणी पुरवठ्याच्या किती योजना कार्यान्वित असून किती प्रलंबित व बंद आहेत,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रलंबित व बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे वा येत आहे,
(५) तसेच प्रश्न भाग (१) मधील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सद्यःस्थितीत साक्री तालुक्यात कुठल्याही गावास टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत नाही.
(३) जिल्हा परिषदेमार्फत साक्री तालुक्यात ५३८ योजना कार्यान्वित आहेत. २४ योजना प्रलंबित व ३ योजना बंद आहेत.
(४) व (५) ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून रखडलेल्या व अपूर्ण योजनांसंदर्भात चौकशी समिती नेमण्यात आली असून चौकशीचे काम पूर्ण झाले असून चौकशी अहवाल अंतिम करण्याचे काम सुरु आहे. चौकशी अहवालानुसार दोषी आढळून आल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

---

**राज्यातील नाटयगृहांची दुरुस्ती करून सुसज्ज करण्याबाबत**

**(१५) २९४७२ (२१-१२-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १२५ नाटयगृहांचे सर्वेक्षण होऊन दीड महिना उलटून गेला तरी अद्यापपर्यंत सांस्कृतिक विभागाकडून सदर नाट्यगृहांची दुरुस्ती करण्यात आली नसल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नाटयगृहाच्या अहवालातील त्रुटीची दखल घेऊन शासनाने नाटयगृहे दुरुस्तीकरिता घेण्याबाबत प्रेक्षकांना सुसज्ज नाटयगृहे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) व (२) राज्यातील नाट्यगृहांचा अंतिम सर्वेक्षण अहवाल नोव्हेंबर, २०१५ मध्ये संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडुन प्राप्त झाला आहे. या अहवालातील शिफारशी तसेच नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन योजनेची रुपरेषा ठरविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथे चित्रनगरी उभारण्याबाबत**

**(१६) २९४९८ (२१-१२-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील चित्रपट सृष्टीला तीन वर्षानी १०० वर्षे पूर्ण होणार असल्याने तत्पूर्वी कोल्हापूर चित्रनगरी दिमाखात उभी राहील असे मा.पालकमंत्री, कोल्हापूर यांनी जाहिर केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी चित्रनगरी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) होय.

(२) कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची कंपनी अधिनियम १९५६ अन्वये स्थापना करण्यात आली आहे. यानुसार सर्वप्रथम सदर महामंडळाच्या संचालक मंडळाचे शासनाने पुनर्गठन केले आहे. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार संरक्षक भिंत तसेच अंतर्गत रस्ते, वीज-पाणी पुरवठा इत्यादी मुलभूत सुविधा प्रस्थापित करण्याच्या कामांना मान्यता प्राप्त आहे, या कामांसाठी शासनाने आतापर्यंत रु.८.९० कोटी एवढे भांडवली अनुदान वितरीत केले आहे. याशिवाय महामंडळाच्या आवश्यकतेनुरुप व्यवस्थापन अनुदान देखील उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर कामांसाठी निविदांची प्रक्रिया कार्यवाहीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी (जि.रत्नागिरी) शहरातील शिवाजीनगर येथे असलेली थिबा राजाची समाधी दुर्लक्षित असल्याबाबत**

**(१७) २९५६९ (२१-१२-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी (जि.रत्नागिरी) शहरातील शिवाजीनगर येथे असलेली थिबा राजाची समाधी दुर्लक्षित असुन ही वास्तू नेहमी बंद असते या वास्तूचा ताबा पुरातत्व खात्याकडे असल्याने पर्यटकांना सदर वास्तु पहावयाची असल्यास प्रशासनाकडे व पुरातत्व खात्याकडे वारंवार पाठपुरावा करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पुरेसा कर्मचारीवर्ग नियुक्त करण्याबाबत तसेच पूर्णवेळ समाधी खुली करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) व (२) थिबा राजा-राणीची समाधी, रत्नागिरी हे राज्य संरक्षित स्मारक असून सदर स्मारकाची माहे डिसेंबर, २०१२ मध्ये जतन-दुरुस्ती व सुशोभिकरण करण्यात आले आहे. सदर समाधी आंतरराष्ट्रीयदृष्ट्या महत्वाची असल्याने सदर समाधी पुरातत्व विभागाचा कर्मचारी उपस्थित असतांनाच खुली ठेवण्यात येते. तथापि पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने ही समाधी आठवड्यातून सहा दिवस अर्धवेळ पर्यटकांसाठी खुली असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील सार्वजनिक जलस्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करण्याबाबत**

**(१८) २९७६८ (२१-१२-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील सार्वजनिक जलस्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण दिनांक २ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागाने दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात अनेक गावांमध्ये दुषित पाण्याकरिता ग्रामस्तरावरुन विविध उपाययोजना हाती घेतल्या जात असताना आरोग्य विभाग व ग्रामपंचायतीमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे याकरिता प्रश्न भाग १ मधील सर्वेक्षणानंतर वस्तुस्थिती विचारात घेऊन तालुकास्तरीय समिती सरपंच व ग्रामसेवक याचा आढावा घेऊन त्रुटी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात येणार असल्याचे आदेशात म्हटले आहे तरी सदर सर्वेक्षण ठराविक मुदतीत संबंधितांनी पूर्ण केले आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०१-२०१६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार अहमदनगर जिल्ह्यामध्ये दि. २ ऑक्टोबर, २०१५ ते दि. ३० ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत पिण्याच्या पाण्याच्या सर्व स्त्रोतांचे सर्वेक्षण करण्यात आले त्यामध्ये एकूण १३१२ ग्रामपंचायतीचे सर्वेक्षण करण्यात आले, त्यापेकी लाल कार्ड एकही ग्रामपंचायतीस देण्यात आले नसून २० ग्रामपंचायतीस पिवळे कार्ड व १२९२ ग्रामपंचायतीस हिरवे कार्ड देण्यात आलेले आहे.

सदर सर्वेक्षण ठराविक मुदतीत सर्व संबंधित गा्रमपंचायतींनी पूर्ण केले आहे.

स्वच्छता सर्वेक्षण अहवालानुसार पिवळे कार्ड देण्यात आलेल्या २० ग्रामपंचायतीस पिवळ्या कार्डातून हिरव्या कार्डात रुपांतरित करणे तसेच नियमित पाणी शुध्दीकरण ओ.टी परिक्षण याबाबत योग्य त्या सुचना जिल्हास्तरावरुन संबंधित ग्रामपंचायतींना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुनाडे (ता.उरण,जि.रायगड) धरणावरील जलशुध्दीकरण प्रकल्पाच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१९) ३०२१९ (२१-१२-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुनाडे (ता.उरण,जि.रायगड ) येथे १५ वर्षापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या माध्यमातून जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील ८ गावातील १५ हजार नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या पुनाडे धरणावरील जलशुध्दीकरण प्रकल्पाची इमारत दुरुस्ती अभावी धोकादायक झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने जलशुध्दीकरण प्रकल्पाच्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) जलशुध्दीकरण प्रकल्पाची इमारत दुरुस्ती अभावी धोकादायक बनलेली नाही. तथापि, या इमारतीमध्ये काही ठिकाणी गळत्या होत असून प्लास्टर निघालेले आहे.
(३) सदरची योजना दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरिता ग्रामीण पाणी पुरवठा समिती, पिरकोन यांच्याकडे दिनांक ०७/०५/२०१० रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे. या समितीकडून इमारत दुरुस्ती प्रस्ताव अद्यापि प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्नाळा (जि.रायगड) किल्ल्याच्या दुरुस्तीबाबत**

**(२०) ३०६७३ (२१-१२-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्नाळा (जि.रायगड)किल्ल्याचा बुरुज आणि तटबंदी ढासळत चालली असून सदर किल्ल्याच्या पायऱ्याही झिजल्यामुळे सदर किल्ल्याची वाटही दिसून येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्याची डागडुजी करण्याकरिता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
कर्नाळा या किल्ल्यातील पायऱ्यांनी नैसर्गिक रित्या झीज झालेली आहे. त्याशिवाय सदर किल्ल्याची प्रचंड प्रमाणात पडझड झाल्याचे आढळून आलेले नाही.
(२) कर्नाळा किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याच्या अनुषंगाने सहायक संचालक रत्नागिरी यांचेकडून किल्ल्याची महसूल विषयक कागदपत्रे तहसिलदार कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात येत आहे. सदर कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अमरावती, औरंगाबाद, कोकण, नागपूर, नाशिक, पुणे या सहा विभागातील व अकोला जिल्ह्यासह अनेक कुटूंबांकडे शौचालयाची सुविधा नसल्याबाबत**

**(२१) ३०७५९ (२१-१२-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती, औरंगाबाद, कोकण, नागपूर, नाशिक, पुणे या सहा विभागातील १६० गावातील शौचालयाचा वापर, पाणीपुरवठ्याच्या सोयीबाबत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेच्या वतीने नागरिकांकडून माहिती घेण्यात आली असून सदर सर्वेक्षणानुसार अंदाजे ६० टक्के घरांमध्ये शौचालय नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात विशेषत: अकोला जिल्ह्यात २ लाख ४३ हजार ८५९ कुटूंबांपैकी १ लाख १९ हजार ७२५ कुटुंबांकडे अद्यापही शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त ठिकाणी शौचालयाची सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०२-२०१६) :**(१) राज्याच्या सहा महसूली विभागांतर्गत अशा पध्दतीचे सर्वेक्षण झाल्याचे आढळून आलेले नाही. तथापि, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी, सुधारित वार्षिक कृती आराखड्यानुसार वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी निश्चित केलेल्या ८, ९७,१९१ या या उद्दिष्टांपैकी डिसेंबर, २०१५ अखेर पर्यंत ४,६९,६६७ एवढ्या

वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सदर बांधकामाची टक्केवारी ही ५२.३४ % एवढी आहे.

(२) व (३) राज्यात एप्रिल २०१२ मध्ये करण्यात आलेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार अकोला जिल्हयातील १,४४,२८० कुटूंबांकडे वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती. त्यापैकी डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत एकूणा ४४,३५१ कुटुंबांना वैयक्तिक शौचालयांची सुविधा उपलब्ध झाली आहे. उर्वरित ९९,९२९ कुटुंबांना वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन अकोला जिल्हा २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याचे जिल्हा प्रशासनाचे नियोजन आहे.

अकोला जिल्हा हागणदारीमुक्त करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत असून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात ३९, १४८ वैयक्तिक शौचालये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जिल्हा व तालूका कक्षामार्फत गृहभेटी, ग्रामसभा, कलापथक कार्यक्रम, प्रभातफेरी यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील उमटे धरण उद्धवातंर्गत उसर ते अलिबाग जुनी पाईप लाईन बदलण्याबाबत

**(२२) ३२०५० (२१-१२-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमटे (ता.अलिबाग, जि.रायगड) धरणाच्या उद्धवांतर्गत उसर प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजने अंतर्गत टाकण्यात आलेली पाईप लाईन जुनी झाली असून तालुक्यातील दमट हवामानामुळे खराब झाल्याने सुरळीत पाणी पुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी नवीन जास्त व्यासाची पाईप लाईन टाकून पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०१-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) उसर ते अलिबाग या दरम्यान उमरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये १६ गावांचा समावेश होता. सन १९९२ पासून अलिबाग शहरास एमआयडीसी मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच सन २००४ पासून उर्वरित १५ गावांना उसर येथील गेल कंपनीसाठी टाकण्यात आलेल्या पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा सुरु असल्याने उमटे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा पाणी पुरवठा बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे उसर ते अलिबाग दरम्यान उमटे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना जुनी व गंजलेली पाईप लाईन नव्याने टाकणेत आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमासाठी खर्च करण्यात आलेल्या निधीबाबत**

**(२३) ३२४५१ (२१-१२-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१ ) राज्यात सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांसाठी सुमारे १०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी जाहीर केल्यानंतर राज्याच्या एकूण अंदाजपत्रकीय तरतूदीपैकी किती टक्के रक्कम गत ५ वर्षात राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांवर खर्च करण्यात आली अशी विचारणा माहिती अधिकार क्षेत्रातील कार्यकर्ते अभय कोल्हारकर यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे माहितीच्या अधिकारात केली असता सन २०१४-१५ या वर्षात ३ कोटी ३१ लाख २६ हजार रुपये इतकी रक्कम सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमांवर खर्च न झाल्याने पुन्हा शासन जमा करावी लागली, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) सन २०१४-२०१५ या वर्षाची प्रत्यक्ष तरतूद पाहता सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमावरील वार्षिक खर्च प्रती व्यक्ती साडेतीन रुपयांवर गेलेला नाही, ध्वनीमुद्रित संग्रहालयासाठी एकही पैसा खर्च करण्यात आलेला नाही, राज्य सिंदी अकादमीला तरतूद असूनही अनुदान देण्यात आलेले नाही, तर राज्य गुजराती साहित्य अकादमीला याच वर्षात २१ लाख रुपये देण्यात आले इतकेच नव्हेतर राज्यातील कला आणि सांस्कृतिक संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या खर्चातही गत ५ वर्षाच्या तुलनेत सन २०१४-२०१५ मध्ये मोठी कपात करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांवर रुपये ४९ कोटी ५७ लाख १४ हजार इतकाच खर्च झाला असून यातील रूपये ३६ कोटी हे केवळ वृध्द कलावंताना मानधन देण्यावर खर्च झालेला आहे व अन्य २० उपक्रम व कार्यक्रमांवर झालेला खर्च रूपये १६ कोटी ६८ लाख १६ हजार एवढा असल्याचे माहितीच्या अधिकारात कळविण्यात आलेले असतानाही मा.सांस्कृतिक मंत्र्यानी जाहीर केल्याप्रमाणे रुपये १०० कोटीच्या अंदाजपत्रकातील अन्य रक्कम कोणत्या उपक्रम व कार्यक्रमांवर खर्च करण्यात आली आहे,

(४) असल्यास, सन २०१४-१५ या वर्षात पूर्ण क्षमतेने निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :**(१)होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. ध्वनीमुद्रित संग्रहालयाकरिता आवश्यक साहित्याची खरेदी न केल्याने तसेच सिंधी साहित्य अकादमीची समिती अस्तित्वात नसल्याने सदर अकादमीवर खर्च न झाल्याने तसेच कला व सांस्कृतिक संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत बऱ्याच संस्थांचे अर्ज अपात्र ठरल्याने त्या खर्चात बचत झाली आहे.

(३) या विभागाच्या अधिनस्त सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्याशिवाय ६ क्षेत्रिय कार्यालये असून त्यांच्याशी संबंधित योजनांवर खर्च झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात पाणी गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत**
**पिण्याच्या पाण्याचे सर्वेक्षण करण्याबाबत**

**(२४) ३२४९६ (२१-१२-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात जलजन्य रोगाचा प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी पाणी व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर मार्फत जिल्ह्यात पाणी गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत असून पिण्याच्या पाण्याच्या १३ हजार ३१० स्त्रोतांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्वेक्षणात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना शुध्द व स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०२-२०१६) :** (१), (२) व (३)

विभागाचा शासन निर्णय क्र.डब्ल्यूक्यूएम-२०१०/प्र.क्र.१९०/पापु-१२,दि.२९/०८/२०१२ अन्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार पावसाळ्यापूर्वी दि. १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत तसेच पावसाळ्यानंतर २ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या कालावधीत वर्षातून दोन वेळा जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण ग्रामीण भागातील कार्यरत जलसुरक्षक व आरोग्य सेवक यांचेमार्फत करण्यात येते. त्यानुसार सन २०१५-१६ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

सदर दोन्ही सर्वेक्षणात शासन निर्णयात दिलेल्या निकषानुसार व आढळलेल्या जोखिमेनुसार संबंधित ग्रामपंचायतींना लाल, पिवळे व हिरवे कार्ड देण्यात आलेले आहे. तीव्र व मध्यम जोखिमेच्या स्त्रोतानुसार संबंधित ग्रामपंचायतींना प्रतिबंधात्मक उपाययोजना व सर्वेक्षणात आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करुन नियमित शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत जिल्हा परिषदेकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यात महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२५) ३२६८२ (२१-१२-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.वैभव नाईक (कुडाळ),** : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यासह दुष्काळावर मात करण्यासाठी पाणी टंचाई परिस्थिती रोखण्यासाठी दिर्घकालीन उपाय सूचविणाऱ्या महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) कायदा शासनाने सन २०१३ मध्ये केला असतानाही या कायद्याची अंमलबजावणी रखडलेली असून जमिनीखालील पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे संरक्षण भूजलाच्या उपलब्धतेनुसार पीक आराखडा आखणे आणि पाण्याचा उपसा थांबविणे यासारख्या तरतूदी कागदोपत्री राहिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्याची गत २ वर्षात प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही तसेच पाण्याचा अतिउपसा झालेला भाग अतिशोषित म्हणून जाहीर करणे, विहिरींची नोंदणी करणे ६० मीटर पेक्षा जास्त भूजल उपशावर कर लावणे ६० मीटर पेक्षा जास्त विंधण विहिर घेण्यास मनाई करणे, पाणी विक्रीवर बंदी घालणे, जमिनीखालील उपलब्ध पाणी साठ्यानुसार पाणी टंचाईची परिस्थिती अशी कायद्यात तरतूद असूनही याबाबत अद्याप अंमलबजावणी झालेली नाही व या अंमलबजावणीची जबाबदारी असलेल्या यंत्रणापैकी मा. मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखालील राज्य पाणलोट व्यवस्थापन परिषदेची आजमितीस स्थापनाच झालेली नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, दुष्काळावर मात करण्यासाठी व पाणी टंचाई रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना सुचविणा-या महाराष्ट्र भुजल (विकास व व्यवस्थापन) कायद्याची सत्वर अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) १. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ दि. १ जून, २०१४ पासून राज्यात लागु झालेला असून, त्यामधील कलम ३ (१) च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर (MWRRA) राज्य भूजल प्राधिकरणाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील कलम १७ च्या तरतुदीनुसार जिल्हा प्राधिकारी म्हणुन महसुल विभागाच्या सर्व उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे.

३. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ अंतर्गच्या कलम ८ (१) नुसार राज्य भूजल प्राधिकरण (MWRRA) यांनी दि. २/८/२०१५ रोजीच्या आदेशान्वये प्रथमत: राज्यातील अतिशोषित व शोषित अशा ८० पाणलोट क्षेत्रामधील समाविष्ट गावांमध्ये, कृषी व औद्योगिक वापरासाठी ६० मी. पेक्षा जास्त खोलीच्या विंधण विहिरी/कूपनलीका

खोदण्यास पुढील आदेश होईपर्यंत प्रतिबंध केला आहे.

४. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील प्रयोजने पार पाडण्याकरीता तयार करण्यात आलेल्या नियमांचा मसुदा अंतिम करणे करीता सर्व संलग्न मंत्रालयीन विभागांचे प्रतिनिधीत्व असलेली समिती दि. ११/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन पनवेल येथील खांदा (जि.रायगड) वसाहतीला लागून असलेल्या आसूडगाव आदिवासी वाडीमधील पाण्याच्या पाईप लाईन दुरुस्त करण्याबाबत**

**(२६) ३२७०५ (२१-१२-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन पनवेल (जि.रायगड) येथील खांदा वसाहतीला लागून असलेल्या आसूडगाव आदिवासी वाडीमधील पाण्याचे पाईप फुटलेल्या अवस्थेत असून त्यामधून गळती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पाण्याच्या पाईप लाईनमधून निघणाऱ्या फवाऱ्यामधून विजेचा प्रवाह होत असल्याचे माहे ऑगस्ट, सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसाहतीमध्ये २५ ते ३० घरे असून दीडशेच्या आसपास आदिवासी या वाडीत राहत असून सदर पाईपलाईनमधील पाणी आदिवासी वापरत असल्याने विजेचा धक्का लागून दुर्घटना घडण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०१-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

मात्र दिनांक ०२/०९/२०१५ रोजी खांदा वसाहतीला लागून आसूडगांव आदिवासीवाडी या ठिकाणी जलवाहिनी फुटल्याचे आढळून आले होते. तथापि, जगेचच दिनांक ०३/०९/२०१५ रोजी शटडाऊन घेण्यात येऊन दुरुस्ती करण्यात आली. तसेच गळती होत असलेल्या ठिकाणी पाण्याच्या फवाऱ्यातून विजेचा प्रवाह होत असल्याबाबत प्रत्यक्ष पाहणीच्या वेळी अथवा लेखी स्वरुपात कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव (मुंबई) चित्रनगरीमध्ये व्यवस्थापकिय संचालकामार्फत करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांच्या नेमणूकीबाबत**

**(२७) ३२७९२ (२१-१२-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) चित्रनगरीमध्ये संरक्षणासाठी दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास एकाचवेळी ५० सुरक्षा रक्षकांची व्यवस्थापकीय संचालकामार्फत नेमणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार शासनमान्य सुरक्षा रक्षक मंडळाकडून सदर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे बंधनकारक असतानाही, त्याचे उल्लंघन करुन व्यवस्थापकीय संचालक यांनी सदरहू ५० सुरक्षा रक्षकांची नेमणूक केल्याप्रकरणी सुरक्षा मंडळाने यापूर्वीच व्यवस्थापकीय संचालक, चित्रनगरी गोरेगाव, मा.सांस्कृतिक कार्यमंत्री आदींकडे लेखी तक्रारीही केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सुरक्षा रक्षक मंडळाकडे वारंवार पत्र व्यवहार करुनही गोरेगांव चित्रनगरी महामंडळास विहित कालावधीत, मागणीनुसार आवश्यक सुसज्ज सुरक्षा रक्षक उपलब्ध होवू शकले नाही. त्यामुळे चित्रनगरीतील सुरक्षा यंत्रणेवर येणारा ताण विचारात घेऊन महामंडळाला संचालक मंडळाच्या ठरावाव्दारे बाहय यंत्रणेकडून पर्यायी सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करावी लागली.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पारोळा (जि.जळगाव) येथील भुईकोट किल्ल्याचे सुशोभिकरण व दुरुस्ती निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२८) ३२९२९ (२१-१२-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगाव) येथील भुईकोट किल्ल्याच्या सुशोभिकरण व दुरुस्तीसाठी पुरातत्व विभागाकडून सन २००१-०२ पासून रु. २,४१,७८,१८५ इतका निधी प्राप्त झाला असून १३ व्या वित्त आयोग वर्ष २०१३-१४ करीता रु. ४.०० कोटी निधी प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुईकोट किल्ल्याच्या सुशोभिकरण व दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदुनसार प्रस्तावित रुपये ४.०० कोटी निधी तातडीने मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) होय,
(२) होय,
(३) सहायक संचालक यांनी कामाची पाहणी केली असून सदर काम पुरातत्व संकेतानुसार झाले आहे. तसे तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पारोळा किल्ल्याकरीता प्रस्तावित रु.४.०० कोटी निधी अद्याप राज्य शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पळासखेडे सिम, मंगरूळ व भोंडण (ता.पारोळा, जि.जळगांव)**
**येथे पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(२९) ३२९३२ (२१-१२-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पळासखेडे सिम (ता.पारोळा,जि.जळगांव) या गावास गत ५ वर्षात ८५ लाख रुपये खर्चाच्या योजना मंजूर होवूनही राजकीय वादामुळे सदर गाव पाण्यापासून वंचित असून तसेच मंगरूळ येथे २० लाख व भोंडण येथे ४८ लाख रूपये खर्च करूनही टँकरने पाणीपूरवठा करावा लागतो व सदर ठिकाणी पाणी मिळत नसल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी अनेकवेळा शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पाणी प्रश्नाबाबत व कामाबाबत प्रत्यक्ष कामाची पाहणी करण्याचे संकेत देवूनही पाहणीकरीता न आलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पळासखेड पाणी पुरवठा योजनेबाबत उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, पाचोरा यांनी दि. २.१२.२०१५ रोजी प्रत्यक्ष चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांचे निलंबनाचा प्रश्न उद्भवत नाही.

पळासखेडेसिम येथील उद्भवास पाणी आवक कमी झाली असल्याने सद्यस्थितीत टंचाई अंतर्गत विंधन विहिरी अधिग्रहीत करुन गावास पाणी पुरवठा केला जातो. तसेच सन २०१४-१५ अंतर्गत मंजूर पाणी पुरवठा योजना प्राधान्याने राबविण्याबाबत ग्राम पाणी पुरवठा समितीकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य गट संसाधन केंद्रातील (पाणी व स्वच्छता) कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यबाबत**

**(३०) ३३००९ (२१-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणी व स्वच्छतेबाबतची कामे करण्यासाठी सन २०११ मधील शासन निर्णयानुसार सर्व जिल्हयात पंचायत समिती स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या गट संसाधन केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा केवळ ६,५०० रुपये मानधनापोटी मिळत असून सदर मानधनात वाढ करण्याबाबत व इतर सोयी-सुविधा मिळण्याबाबतची मागणी सदर कर्मचाऱ्यांच्या संघटनेने निवेदनाद्वारे शासनाकडे केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुंषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०१-२०१६) :** (१) होय.
(२) या विभागाच्या दिनांक २० मार्च, २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकातील प्रसुती रजेची तरतुद गट संसधान केंद्रातील महिला कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यात आली आहे. तथापि, उर्वरित मागण्या सद्य:स्थितीत मान्य करणे शक्य नसल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ व दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बळसोंड (ता.जि. हिंगोली) या हिंगोली नळ पाणी पुरवठा योजनेचा प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत**

**(३१) ३३०९८ (२१-१२-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बळसोंड (ता.जि. हिंगोली) या हिंगोली शहरालगतच्या ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या वस्त्यांना पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करण्याचे काम गत २ ते ३ वर्षापासून सुरु असुन अद्यापही परिपूर्ण प्रस्ताव तयार झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नळपाणी पुरवठा योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन त्यास निश्चित किती कालावधीत शासनाकडून मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बळसोंड, ता.जि.हिंगोली नळ पाणी पुरवठा योजनेचे रु. ८,०२,१०,१००/- इतक्या ढोबळ किंमतीचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नांदेड यांनी तयार करुन त्यास दि. ३१.८.२०१५ ला तांत्रिक मान्यता दिली आहे. सदर योजना दिनांक १८.०१.२०१६ रोजी शासन मान्यतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. हिंगोली यांनी सादर केली आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदर योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार करण्यात येते. केंद्र शासनाच्या दि. २९.७.२०१५ च्या पत्रान्वये १) ज्या योजनांना दि. २९.६.२०१५ पूर्वी कार्यादेश दिलेले आहेत. तसेच ज्या योजना प्रत्यक्षात प्रगतीपथावर आहेत अशाच योजनांवर निधी खर्च करण्यात यावा. २) ज्या योजनांना राज्यस्तरीय योजना समितीने (SLSSC) मान्यता दिलेली आहे, परंतु सदर योजना नियोजन टप्पा/निविदा प्रक्रियेत आहेत अशा योजनांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येवू नये. असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने कार्यवाही करणेबाबत दिनांक १४.८.२०१५ च्या पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगांव (जि. नाशिक) तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना पुरवठा विभागाकडून योग्य पुरवठा करण्यात येत नसल्याबाबत

**(३२) ३३१५२ (२१-१२-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि. नाशिक) तालुक्यातील ७० टक्के दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना शासन निर्णयानुसार पुरवठा विभागाकडून योग्य पुरवठा करण्यात येत नसल्याने या प्रकरणी सखोल चौकशी होऊन कार्यवाही करण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१६) :** १) होय.

(२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या, परंतु लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पूर्वी लाभ घेत असलेल्या उर्वरित एपीएल

(केशरी) गटातील सुमारे १७७.१९ लक्ष लाभार्थ्यांना दिनांक १७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये अन्नधान्य देण्याबाबतच्या निर्णयास स्थगिती देण्यात आली असल्याने सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येत नाही.

तसेच, केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्याच्या केरोसीन नियतनामध्ये कपात केली असून सध्या राज्याच्या मागणीच्या २९ टक्के केरोसीनचे नियतन केंद्र शासनाकडून प्राप्त होत आहे. त्यानुसार उपलब्धतेच्या प्रमाणात सर्व जिल्ह्यांना केरोसीनचे नियतन मंजूर करण्यात येत आहे. केरोसीनच्या नियतनात वाढ करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

---

**धर्माबाद (जि. नांदेड) तालुक्यातील प्राचीन काळातील हेमाडपंथी मंदिराचा जिर्णोध्दार करुन पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत**

**(३३) ३३३७१ (२१-०१-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि. नांदेड) तालुक्यात आढळुन येणारी प्राचीन काळातील हेमाडपंथी मंदिरे व अवशेष यांची जपणुक करण्यासाठी दुर्लक्ष होत असल्याने हा बहुमोल वारसा लोप पावण्याच्या मार्गावर असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हेमाडपंथी मंदिराचा जिर्णोध्दार करुन पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१), (२) व (३) धर्माबाद तालुक्यात एकूण सात हेमाडपंथी मंदिरे आहेत, सदर मंदिरांची पाहणी राज्याच्या पुरातत्व विभागामार्फत करण्यात आली आहे. सदर मंदिरापैकी महादेव मंदिर, येवती हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच उर्वरीत मंदिरे ही राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यायोग्यतेची नाही.

पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याची मागणी अथवा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती नांदेड यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांचेमार्फत पर्यटन स्थळांचा दर्जा देण्याची कार्यवाही करण्यात येते.

त्यास अनुसरुन मौजे संगम येथील संगमेश्वर मंदिरास वर्ष १९९८ मध्ये क वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला आहे. जिल्हा नियोजन समितीने सदर मंदिर परिसरात सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात रु.४९.८८ लक्ष इतक्या रकमेची तर सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात रु.३८.४१ लक्ष इतक्या रकमेची कामे पुर्ण केली आहेत.

---

**राहुरी (जि.अहमदनगर) तालुक्याच्या उत्तर पूर्व भागातील गावांना मुळ धरणातून पाणी योजना राबविण्याची मागणी**

**(३४) ३३३९९ (२१-१२-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.अहमदनगर) तालुक्याच्या उत्तर पूर्व भागातील १५ गावांना मूळ धरणातून पाणी योजना राबविण्याची मागणी सदर भागातील नागरिकांनी केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :** (१) नाही. जिल्हा परिषदेकडे अशी मागणी प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निना राऊत इंटरप्राईजेस कंपनीला शासनाकडून लोकमान्य एक युगपुरुष या मराठी चित्रपटास अनुदान रक्कम मिळण्याबाबत**

**(३५) ३३६६३ (२१-१२-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लोकमान्य एक युगपुरुष या मराठी चित्रपटास निना राऊत इंटरप्राईजेस कंपनीने शासन निर्णयानुसार ५० लाख रुपये अनुदान रक्कम मिळण्याकरीता सन २०१२ मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव सादर करुनही अद्याप त्यास शासनाकडून मंजूरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रलंबित प्रस्तावास शासनाने तातडीने मंजूरी देवून, निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व किती निश्चित कालावधीत सदर कार्यवाही शासनाकडून पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :**(१) लोकमान्य एक युगपुरुष या मराठी चित्रपटास अनुदान मिळण्याचा प्रस्ताव विभागास सप्टेंबर, २०१३ मध्ये प्राप्त झाला. परंतु सदर प्रस्ताव प्रचलित योजनेतील अटी-शर्तीची पुर्तता करत नसल्याने त्यास निधी उपलब्ध करुन देण्यास वाव नव्हता.

(२) आता, या चित्रपटास ५२ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपट क्र. ३ चे पारितोषिक मिळाले असल्याने प्रचलित योजनेनुसार अर्थसहाय्य मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोट (जि.अकोला) ८४ खेडी प्रादेशिक ग्रामीण नळपाणी**
**पुरवठा योजना दुरुस्त करण्याबाबत**

**(३६) ३३८७६ (२१-१२-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील अकोट ८४ खेडी प्रादेशिक ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना नादुरुस्त झाल्याने सदर वितरण प्रणाली दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग अकोला यांनी ११.३४ कोटी रुपयांची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजना दैनिक देखभालीसाठी जिल्हा परिषद अकोला यांनी हस्तांतरीत करुन घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषद अकोला यांनी दैनिक देखभालीसाठी हस्तांतरीत करुन न घेण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त योजनेची दुरुस्ती करुन सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अकोला जिल्ह्यातील अकोट ८४ खेडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे आवश्यक तांत्रिक कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. सदर योजनेच्या वान धरण संयुक्त उद्भवातून नगर परिषद, तेल्हारा व नगर परिषद अकोट यांना पाणी पुरवठा या योजनेतून सुरु असल्याने देखभाल दुरुस्तीसाठी जि.प. अकोला यांनी अडचण दर्शविली आहे. तसेच सदर योजना सुरु ठेवण्याकरिता जिल्हा परिषदेकडे पुरेसा निधी नसल्याने त्याचप्रमाणे पाईप गळती जास्त असल्याने व योजनेतील इतर दोष/त्रुटींची पूर्तता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत न केल्यामुळे सदर योजना जिल्हा परिषदेने हस्तांतरित करुन घेतली नाही.

(४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांचे शासन निर्णय क्र. टंचाई २०१५/प्र.क्र१०५/पापु-१४ दि. ११.१.२०१६ अन्वये अकोट ८४ खेडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरूस्तीच्या रु. १०,२०,७०,०००/- इतक्या किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्ट्यातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावाच्या मान्यतेबाबत

**(३७) ३३८७८ (२१-१२-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्ट्यात पिण्याचे पाणी पुरवठा करावयाच्या शिवर व ६ गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग अकोला यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आलेला प्रस्ताव मान्यते शिवाय परत पाठविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव केन्द्र शासनाच्या दिनांक २९ जुलै, २०१५ च्या सूचनांचा संदर्भ देत परत करते वेळी, सदर पाणी पुरवठा योजना खारपाणपट्टयात असुन, स्थानिक भुगर्भातील पाणी पिण्यायोग्य नाही ही बाब दुर्लक्षुन प्रस्ताव परत पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाणीपुरवठा योजना खारपाणपट्टयात येत असल्याची बाब स्थानिक लोकप्रिनिधींनी शासनाचे निदर्शनास आणून विशेष बाब म्हणून मंजूर करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पाणी पुरवठा पाणी पुरवठा योजनेस मंजुरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) केंद्र शासनाच्या दि. २९/७/२०१५ पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार Fluroide बाधित क्षेत्र तसेच संसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांव्यतिरिक्त राज्यात नव्याने कोणत्याही उपाययोजना घेऊ नयेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

शिवर व ६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील गावांचा Fluroide अथवा Arsenic बाधित स्त्रोतामध्ये समावेश नसल्याने तसेच संसद आदर्श ग्राम योजनेतील गावांमध्ये समावेश नसल्याने, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार, प्रस्तुत शिवर व ६ गांवे ता. व जि. अकोला प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून पुढील सुधारीत सूचना येईपर्यंत मान्यता देणे उचीत होणार नाही.

त्यानुसार, विभागाच्या दि. ४/९/२०१५ च्या पत्रान्वये शिवर व ६ गावे प्रादेशिक ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे परत पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक अंतर्गत नांदगावसह ५६ खेडी प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेचे नुतनीकरण करणेबाबत**

**(३८) ३४४१४ (२१-१२-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत असलेली नांदगावसह ५६ खेडी प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेचा संकल्पित कालावधी सन २००६ मध्ये संपुष्टात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेचे शासन स्तरावरून नुतनीकरण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी,नांदगाव यांनी दिनांक २३ जुलै,२०१५ रोजीच्या लेखी पत्राद्वारे मा. मुख्यमंत्री तसेच मा. पाणी पुरवठा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर योजनेचे नूतनीकरण करण्याचे अनुषंगाने सदर योजनेचे सर्वेक्षण व अंदाजपत्रक आराखडे तयार करण्याकरीता सन २०१५-१६ चे कृती आराखडयात रु. ५०.००/- लक्ष ची तरतूद करण्यात आली होती. तथापि, शासनपत्र दि. ३०.६.२०१५ अन्वये सन २०१५-१६ च्या कृती आराखडयात समाविष्ट असलेल्या कोणत्याही योजनेचे काम सद्यस्थितीत हाती न घेणेबाबतच्या सूचना प्राप्त झाल्याने सर्वेक्षणाबाबतची पुढील कार्यवाही स्थगित करण्यात आलेली आहे.

मात्र संबंधित ग्रामपंचायतीकडून योजना स्विकृती ठराव व अस्तित्वातील योजनाबाबतची माहिती मागविण्यात व आलेली असून मालेगाव तालुक्यातील १० व नांदगाव तालुक्यातील २ ग्रामपंचायतीचे ठराव प्राप्त झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील शिधावाटप संस्थांच्या कार्यपध्दतीबाबत**

**(३९) ३६७०७ (२१-१२-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील शिधावाटप संस्थेच्या कार्यपध्दतीबाबत दिनांक ३० जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री महोदयांनी विधानभवनातील दालनात बैठक बोलाविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थनिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांना

माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन देवून चौकशीची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) (४) व (५) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडून चौकशी करण्यात येत आहे.

---

**जळगांव जिल्हयातील केशरी कार्ड धारकांना धान्य वेळेत मिळत नसल्याबाबत**

**(४०) ३६८६८ (२१-१२-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील ९० हजार केशरी कार्ड धारकांना गत ८ महिने धान्य मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान्याचे भाव वाढल्यामुळे नागरिक पुन्हा रेशन दुकानाकडे येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेशन दुकानावर मिळणारे धान्य वेळेत मिळत नसल्यामुळे बऱ्याच वेळा दुकानावर फेऱ्या मारत बसावे लागत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी रेशन दुकानावर धान्य लवकर व नियमित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१६) :**(१), (२), (३),(४) व (५) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या, परंतु लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पूर्वी लाभ घेत असलेल्या उर्वरित एपीएल (केशरी) गटातील सुमारे १७७.१९ लक्ष लाभार्थ्यांना दिनांक १७ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये अन्नधान्य देण्याबाबतच्या निर्णयास स्थगिती देण्यात आली असल्याने सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येत नाही

---

**नाशिक येथील गोदावरी नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने नदीचे पाणी तपासणीसाठी पाठविल्याबाबत**

**(४१) ३६८८४ (२१-१२-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यात गोदावरील नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने (एमपीसीबी) पर्वणीच्या काळातील २४ तासांमध्ये नदीचे सात ते आठ नमुने तपासणीसाठी घेतले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नमुने एमपीसीबीच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नमुन्यांच्या तपासाचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम (०१-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय.
अ) अहवालानुसार विद्राव्य प्राणवायूचे प्रमाण विहित प्रमाणात आळून आले. बि.ओ.डी.चे प्रमाण काही ठिकाणी प्रमाणापेक्षा जास्त आढळले होते.
ब) सदरहू परिक्षणाचे अहवाल स्थानिक महानगरपालिका व विभागीय आयुक्त कार्यालय यांना पुढील कार्यवाहीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्याला पुरवठा विभागाकडून पुरेसा अन्नधान्याचा पुरवठा झाला नसल्याबाबत**

**(४२) ३६९३० (२९-१२-२०१५). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्याला माहे ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यात २ हजार क्विंटल अन्नधान्याची गरज असताना पुरवठा विभागाकडून ९८० क्विंटल अन्नधान्य प्राप्त झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिन्याला १०२० क्विंटलची तूट निर्माण झाल्याने अनेक गावातील शेतकरी व शेतमजूर यांना सदर योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरवठा विभागाकडून अन्नधान्याचा पुरवठा का करण्यात आला नाही,

(४) असल्यास, १०० टक्के धान्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदर पुरवठा कधीपर्यन्त करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतक-यांना प्राथमिक आकडेवारीनुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचे आदेश दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आले. लाभार्थ्यांच्या निवडीबाबत प्रत्येक दुकाननिहाय प्रत्यक्ष सर्वेक्षण केल्यानंतर शेतकरी लाभार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आल्याने, त्यानुसार दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ च्या आदेशान्वये अतिरिक्त नियतन देण्यात आले.त्यानुसार सर्व पात्र लाभार्थ्यांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये अन्नधान्याचे वाटप करण्यात आले. त्यानंतरच्या कालावधीत पात्र लाभार्थी संख्येप्रमाणे १०० टक्के अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

---

### जालना जिल्हयातील ग्रामिण भागात मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत

**(४३) ३६९७४ (२१-१२-२०१५). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयातील ग्रामीण भागात प्रचलित असलेली सर्व पाणीपुरवठा योजना रद्द करुन यापुढे फक्त मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी केव्हापासून अंमलात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०२-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
केंद्र शासनाने दि. २९ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील योजना प्राधान्याने पूर्ण करण्यात याव्यात. तसेच संसद आदर्श ग्राम व फ्लोराईड व अर्सेनिक बाधित गावे/वाडया वगळता इतर गावांमध्ये नवीन नळपाणी पुरवठा योजना न घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) राज्यातील जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा राज्य शासनाचा स्वतंत्र कार्यक्रम राबविण्याचे विचाराधीन असून शासन मान्यता मिळाल्यानंतर सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे टेंभूर्णी (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथे राष्ट्रीय पेयजल योजने अंतर्गत मंजूर पाणीपुवठा योजनेच्या कामाची निविदाप्रक्रीया करण्यास परवानगी मिळणे बाबत**

**(४४) ३७८०९ (२१-१२-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टेंभूर्णी ( ता. जाफ्राबाद, जि.जालना) येथे राष्ट्रीय पेयजल योजने अंतर्गत सुमारे ४.७४ कोटी रुपये खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेला दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेच्या कामाच्या निविदा प्रक्रियेची परवानगी मिळण्याकरिता दिनांक २२ जुलै, २०१५ रोजीच्या पत्राव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना यांनी प्रधान सचिव, पाणीपुवठा यांच्याकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या कामाची निविदा प्रक्रिया करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदर योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वे व निर्देशानुसार करण्यात येते. या संदर्भात केंद्र शासनाच्या दि. २९.७.२०१५ च्या पत्रान्वये ज्या योजनांना राज्यस्तरीय योजना समितीने (SLSSC) मान्यता दिलेली आहे, परंतु सदर योजना नियोजन टप्पा/निविदा प्रक्रियेत आहेत अशा योजनांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येवू नये. असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने कार्यवाही करणेबाबत दिनांक १४.८.२०१५ च्या पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदे यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील दिवे घाटातील ऐतिहासिक मस्तानी तलावाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४५) ३८००० (२१-१२-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील दिवे घाटाच्या कुशीत वसलेल्या ऐतिहासिक मस्तानी तलावातील गाळ काढून साठवण क्षमता वाढविणे, पडलेल्या भिंती, संरक्षक कठडयाची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मस्तानी तलावाची दुरुस्ती करण्यासंदर्भात पुरातत्व विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) मस्तानी तलाव हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित नाही. पुरातत्व विभागामार्फत राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येते. सदर तलावातील गाळ काढून साठवण क्षमता वाढविण्याकरिता कार्यकारी अभियंता , लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांनी सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांचेकडे परवानगी मागितली होती. त्यास अनुसरुन सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग , पुणे यांनी गाळ काढण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. मस्तानी तलावाची देखभाल वनविभागाकडे असल्याने व वनविभागाकडून परवानगी न मिळाल्यामुळे कार्यकारी अभियंता , लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांना सदर तलावातील गाळ काढता आला नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळा मार्फत करण्यात येणाऱ्या धान्य खरेदी बाबत

**(४६) ३८०२२ (२१-१२-२०१५). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ आदिवासी सेवा सहकारी संस्थे मार्फत मोठ्या प्रमाणावर धान्य खरेदी करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी केलेले धान्य साठवणूक करण्याकरिता गोदामांची पुरेशी व्यवस्था नाही व गोदामांची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे जमा धान्य मोठ्या प्रमाणात सडते व खराब होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर जिल्ह्यात नवीन गोदाम बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच धान्य खरेदीबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

हंगाम २०१४-१५ मध्ये गोदाम क्षमतेअभावी गडचिरोली जिल्ह्यात एकूण ३१ खरेदी केंद्रांवर २६,६३२.२७ क्विंटल धान पूर्ण पावसाळ्यातही ताडपत्र्यांनी झाकून साठविलेले आहे, सद्यस्थितीत भरडाईची मुदत संपल्यानंतर शिल्लक राहिलेल्या धानाची विल्हेवाट झाल्यानंतर संपूर्ण धानाची उचलीनंतरच खराब झालेल्या धानाबाबत नेमकी माहिती उपलब्ध होणार आहे.

(३) गडचिरोली जिल्ह्यात महामंडळामार्फत आरमोरी व राजूपर पॅच ही २ गोदामे पूर्ण होऊन वापरात आहेत. याशिवाय नवेगाव येथे १ नवीन गोदामाची बांधकाम प्रक्रिया अंतिम टप्प्यात सुरु आहे तसेच अहेरी व कोरची हया २ गोदामांची बांधकामासाठी प्रक्रिया हाती घेण्यात येत आहे.

शासन निर्णय, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ अन्वये आदिवासी क्षेत्रात हंगाम २०१५-१६ केंद्र शासनाने मंजूर केलेल्या आधारभूत दराने धान खरेदीसाठी गडचिरोली जिल्ह्यात प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत ३९ केंद्र व अहेरी अंतर्गत १६ केंद्रे अशी एकूण ५५ केंद्रे जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने मंजूर केली आहेत. त्या केंद्रांवर सद्यस्थितीत १,६०,१३३.७५ क्विंटल धानाची खरेदी शेतकऱ्यांकडून झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड शहरासाठी येणारे रेशनचे रॉकेल इतरत्र अवैधरित्या वापरले जात असल्याबाबत.**

**(४७) ३८२७४ (२१-१२-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरासाठी येणाऱ्या रेशनच्या रॉकेलचा वापर प्रवासी रिक्षा, वाळुचे ट्रक तसेच इतर छोट्या-मोठ्या प्रवासी वाहनांसाठी केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी वाहनांना ठेकेदार रॉकेल पुरवीत असून, अर्धघाऊक, ठेकेदारांच्या नावावर पावत्या बनवून कागदोपत्री रेकॉर्ड दाखवून खाजगी वाहन चालकांना रॉकेल दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रेशनच्या रॉकेलचा होणारा गैरवापर बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खरजई (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथे नळपाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४८) ३८६११ (२१-१२-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खरजई (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथे राष्ट्रीय पेयजल योजने अंतर्गत नळपाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर योजनेचे काम दर्जेदार व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. योजनेचे काम दर्जेदार व्हावे यासाठी कामाच्या टप्प्यानुसार शाखा अभियंता/उपअभियंता यांचेमार्फत संबंधित ग्रामपाणी पुरवठा स्वच्छता समितीस योजनेच्या कामांच्या सूचना देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयातील ६ लाख २५ हजार शेतकरी अन्न सुरक्षा योजनेंतर्गत असलेल्या धान्य वाटपापासून वंचित असल्याबाबत**

**(४९) ३९६०२ (२१-१२-२०१५). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांचा अन्न सुरक्षा योजनेत समावेश करुन त्यांना अल्प दरात धान्य वाटप करण्याचा निर्णय झालेला आहे सदर निर्णयानुसार मराठवाडयातील ३५ लाख ५० हजार शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे, पैकी २९ लाख २८ हजार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळालेला असून ६ लक्ष २५ हजार शेतकरी धान्य वाटपापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६ लक्ष २५ हजार शेतकऱ्यांना धान्य वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१६)** :(१) हे खरे नाही. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या मराठवाड्यातील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतक-यांना प्राथमिक आकडेवारीनुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचे आदेश दि.०९.०९.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले लाभार्थ्यांच्या निवडीबाबत प्रत्येक दुकाननिहाय प्रत्यक्ष सर्वेक्षण केल्यानंतर शेतकरी लाभार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आल्याने, त्यानुसार दि.१६.९.२०१५ च्या आदेशान्वये अतिरिक्त नियतन देण्यात आले. त्यानुसार सर्व पात्र लाभार्थ्यांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.त्यानंतरच्या कालावधीत पात्र लाभार्थी संख्येप्रमाणे १०० टक्के अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे,

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुराभिलेख विभागातील नियमबाह्य पदोन्नती झाल्याबाबत**

**(५०) ३९६०७ (०६-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुराभिलेख विभागामध्ये नियमबाह्य पध्दतीने भरती झाली असून छायाचित्रकार पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता नसतांना पद भरती करण्यात आली तसेच इतर पदाची

पात्रता वा त्या समकक्ष नसणाऱ्यांना या विभागातील सहाय्यक संचालक आस्थापना या पदाचा अतिरिक्त कारभार देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यां विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :** (१) व (२)

पुराभिलेख संचालनालयातील नियमबाह्य नियुक्त्यांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

सन १९९० मध्ये छायाचित्रकार पदावर नियुक्त्या करण्यात आल्या असून यासंदर्भात सन २०१५ मध्ये तक्रार प्राप्त झाली असून त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु आहे,

सद्य:स्थितीत संचालक, पुराभिलेख संचालनालय यांनी विभागप्रमुख या नात्याने प्रशासकीय सोईस्तव समवेतनश्रेणी धारण करणाऱ्यास सहाय्यक संचालक (आस्थापना) या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.